Vol 5 Issue 3 Dec 2015

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra
Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 3 | Dec - 2015

Review Of Research

# आदिवासी जमीन पुनः प्रस्तापन कायदे परिणामकारकता व गरज

वैशाली पाटील

**गोशवारा :–**

महाराष्ट्र राज्य हे भू–सुधार कायद्यांबाबत पुरोगामी म्हणून ओळखले जाते. भारतीय संविधान अनुच्छेद 46 मध्ये वर्गिकृत जाती व जमाती यांचा विकास करणे, सामाजिक अन्यायापासुन आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य राहील असे नमुद केले आहे. संविधानातील या तरतूदींची अंमलबाजावणी करणे हा आदिवासी जमीन पुनः प्रस्तापन कायद्यांचा प्रमुख उद्देश्य आहे. या कायद्यातील तरतुदी व अंमलबजावणीची परिणामकारकता याबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे याचा उलगडा करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :–**

आदिवासी सर्वत्रच सरळ, साधे–भोळे, भाभडे, भित्रे, परंतु प्रामाणिक, सच्चे दिलेला शब्द पाळणारे, विश्वास ठेवणारे माणुसकी बाळगणारे, त्याच बरोबर निरक्षर, खेडेगावात, डोंगरात, जंगलात रहाणारे. तेंव्हा त्यांचा फायदा सुशिक्षित पूढारलेल्या चतुर, लबाड, घातकी धनिक सवर्णांना घेऊन त्याच्याकडील जमीनी धाकधपटशा दाखवून फसवुन, भुलथापा देऊन प्रचंड प्रमाणावर बळकावल्या. जमीनी बळकावण्याची ही प्रक्रिया गेली कित्येक शतके चालू आहे. ब्रिटीश राजवटीत मोठ्या प्रमाणावर आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण बिगर आदिवासींकडे झाले. परिणामी आदिवासी भूमिहीन झाले. कालांतराने वेठबिगार झाले. जंगलात, डोंगरात ढकलले गेले.



स्वातंत्र मिळाल्यानंतर जमीनी सुधारणा कायदे झाले. त्यानंतरही आदिवासीकडील जमीनींचे हस्तांतरण अव्याहतपणे चालूच राहीले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पंचवार्षीक योजनांप्रमाणे भूमिहीन म्हणून आदिवासींना सरकारी जमीनी मोठ्या प्रमाणावर मंजूर करण्यात आल्या. कमाल जमीन धरणा कायद्याप्रमाणे ठरविण्यात आलेल्या वाढवा जमिनी त्यांना प्राधान्यक्रमाने मंजुर करण्यात आल्या. भिन्न–भिन्न शासकीय ठरावांनी आणि वनखात्याच्या जमीनीतील अतिक्रमणे नियमाकुल करण्यात आली. आदिवासी क्षेत्रातील अक्षरशः नव्याने हजारो आदिवासी अतिक्रामकांना जमीनी मंजूर झाल्या. आदिवासींना नव्याने मंजूर झालेल्या या जमिनींचे हस्तांतरणही मोठ्या प्रमाणावर बिन दिक्कतपणे होऊ लागले. तेंव्हा आदिवासींची जमीन बिगर आदिवासींकडे जिल्हाधिका–यांच्या परवानगीशिवाय करण्यावर कायद्याने बंदी घालण्यात आली.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 मध्ये कलम 36 व 36 अ ने त्यासाठी तरतूद करण्यात आली. तरीही आदिवासींच्या जमीनी बेकरयदेशीरपणे हस्तांतरीत होणे अव्याहतपणे चालूच राहीले. मुंबई शेतजमीन आणि कुळवहीवाट अधिनीयम 1948 मध्ये क्रांतीकारक सुधारणा 1956 मध्ये करण्यात आली. 1 एप्रिल 1957 या " कृषी दिनी " कसेल त्याची जमीन या तत्वानुसार कुळे त्यांचेकडील जमीनीची गृहीत खरेदीदार झाले त्यांना चिथावणी देवून, लालूच दाखवून, धाकदपटशा देऊन पुर्वीच्याच जमीनी मालकांना भाडेपटट्याने त्याच्या जमीनी देण्यास त्यांना प्रवृत्त करण्यात आले. मग त्या जमीनी जमीन मालकांना रितसर मुंबई कुळकायद्याचे कलम 32 ओ (कलम 'फ' सह वाचून) प्रमाणे खरेदी देण्यात आल्या.

धुळे जिल्ह्यात 160 बाबीत 860 एकर तर ठाणे जिल्ह्यात 34 बाबीत 154 एकर जमीन कलम 36 (2) चा भंग करून आदिवासींकडुन बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत झाल्याचे आढळून आले.

ठाणे जिल्ह्यात जव्हार, पालघर आणि डहाणू तालुक्यातून आदिवासींची जमीन बिगर आदिवासी कसत असल्याचे दिसून आले.

तेंव्हा तीन तहसिलदारांची एक समिती नेमण्यात आली. त्यांनी ठाणे जिल्हयात 2200 बाबी तपासल्या आणि त्यापैकी 1200 बाबींमध्ये आदिवासींकडे जमीनी कब्जा पुनः प्रस्तापित करण्यात आला. तर धुळे जिल्हंयात खास अधिकारी नेमुन अशी तपासणी करण्यात आली. तेथे 1500 बाबी तपासण्यात आल्या. त्यापैकी 611 म्हणजे 47 टक्के बाबींमध्ये कायद्याचा भंग केल्याचे आढळून आले.

आदिवासींच्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशिर जमीन हस्तांतरणामुळे आदिवासीं जिल्हयांतून विशेषतः ठाणे आणि धुळे जिल्हयातून तीव्र असंतोष वर्षानुवर्षे धुमसत राहीला. परीणामी जिल्हयातील भूमिसेनेच्या आणि धुळे जिल्हयांत श्रमिक संघटनेच्या नेतृत्वाखाली व्यापक परिणामावर " जमीन बळकाव " आदोलन आदिवासींनी सुरू केले.शेकडो आदिवासी तुरूंगात गेले. त्यानी शिक्षा भोगल्या. पण आंदोलन चालुच राहीले. ठिकठिकाणी संघर्ष सुरू झाले. महाराष्ट्र शासनाला आदिवासींमधील असंतोष शमवणे, त्याला वैधानिक वाट करून देणेची आवश्यकता तिव्रतेने वाटू लागली.

परिणामी महाराष्ट्र शासनानी सातत्याने विचार करून आदिवासींच्या एकूण जमीन विषयक समस्यांवर विचांर करण्यासाठी 15 मार्च 1971 रोजी तेंव्हाचे महसुल मंत्री श्री. ह.गो.वर्तक यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली.या कमिटीने खूप मेहनत घेऊन सखोल अभ्यास करून, शिफारशींसह आपला अहवाल 7 एप्रिल 1972 रोजी शासनाकडे सुपुर्द केला.

वर्तक कमिटीच्या अहवालातील शिफारशींपैकी आदिवासींच्या बिगर आदिवासीकडे झालेल्या व होत असलेल्या बेकायदेशीर जमीन हस्तांतरणाबाबतच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी 6 जुलै 1974 रोजी महाराष्ट्र सरकारने वटहुकुम काढला. या वटहुकुमाने 6 जुलै 1974 नंतर आदिवासींकडील जमीनी बिगर आदिवासीकडे हस्तांतरीत झाल्या असतील तर त्या संबंधित आदिवासींकडे बोजाविरहित पुनःप्रस्थापित करण्याचे ठरविण्यात आले.या वटहुकुमाचे रीतसर कायद्यात रूपांतर करण्यांत आले. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व कुलवहीवाट विधी (सुधारणा) अधिनीयम 1974 (महाराष्ट्र अधिनीयम क्रमांक 35 / 1974) करण्यात आला.

6 जुलै 1974 नंतरच्या हस्तांतरीत जमीनींबाबत आणि त्यापूर्वीच्या बेकायदेशिर जमीन हस्तांतरणांबाबत कायदा केल्यानंतरही 1 एप्रिल 1957 च्या कृषी दिनानंतर 6 जुलै 1974 पर्यंत झालेल्या आदिवासींच्या हस्तांतरीत जमीनी पुनः प्रस्तापित करण्याचा प्रश्न शिल्लक राहीला तेंव्हा त्याकरीता महाराष्ट्र अनुसूचित जमीन पुनः प्रस्थापित करण्याचासाठीचा कायदा 1975 (महाराष्ट्र अधिनीयम क्रमांक 14 / 1909) करण्यात आला आहे. हा कायदा दिनांक 28 मे 1975 पासून अमलात आला आहे.

### *आदिवासी जमीन विशयक कायदे*

एक : महाराष्ट्र जमीन महसूल अधिनीयम व कुळवहिवाट विधि (सुधारणा)
अध्यादेश 1974 (महाराष्ट्र अधिनीयम क्र. 35 / 1974) अंमलात आल्याचा दिनांक 6 जुलै 1974.
दोन : महाराष्ट्र अनुसुचित जमीनी पुनःप्रस्थापित करण्यासाठीचा कायदा 1975
(महाराष्ट्र अधिनीयम क्र. 14 / 1975)
राष्ट्रपतींची संमती 28 एप्रिल 1975,
कायदा अंमलात आल्याचा दिनांक 28 मे 1974.

### *कालावधी :– आदिवासी कायदा क्र.35 / 1974*

आदिवासी कायदा 15 / 1974 चा अंमल 6 जुलै 1974 पासून सुरू होतो. 6 जुलै 1974 नंतर होणा–या आदिवासींच्या जमीन हस्तांतरणास तो लागू होतो. तसेच 1 एप्रिल 1957 नंतर झालेल्या बेकादेशीर म्हणजे अवैध जमीन हस्तांतणासाठी देखील तो लागू होतो.

### *आदिवासी कायदा क्रमांक 14 / 1975*

1 एप्रिल 1957 पासून 6 जुलै 1904 पर्यंतच्या ज्या जमीनी आदिवासींकडून बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत झाल्या अशा सर्व प्रकरणांना हा कायदा पूर्वलक्षी प्रभावाने लागू होतो.

### *दोन्ही कायद्यांचा उद्देष*

आदिवासींकडील (अनुसुचित जमाती) जमीनीचे हस्तांतरण जिल्हाधिका–यांच्या परवानगीशिवाय बिगर आदिवासींकडे होऊ न देणे.

1 एप्रिल 1957 ला म्हणजे सुधारीत कुळ कायद्याच्या कृषी दिनानंतर जमीन बेकायदेशिरपणे हस्तांतरीत जमीन झाली असेल तर अशी हस्तांतरण बेकायदेशिर ठरवून ती रद्द करणे आणि हस्तातरीत जमीनीचा कब्जा बिगर आदिवासी कडून काढून घेऊन तो आदिवासीकडे पुनः प्रस्तापित करणे.

1 एप्रिल 1957 ते 6 जुलै 1974 पर्यंतच्या आदिवासींच्या बिगर आदिवासींकडे कायदेशीरपणे हस्तांतरीत झालेल्या जमीनी बिगर आदिवासी कडून घेऊन संबंधित आदिवासींकडे बोजा विरहीत पुनः प्रस्तापित करणे. त्याचप्रमाणे 6 जुलै 1974 नंतर आदिवासींकडील जमीनी बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत झाल्या असतील तर त्या पुनः संबंधित आदिवासींकडे बाजारहीत पुनःप्रस्तापित करणे आणि संबंधित आदिवासींने जमीन स्विकारली नाही तर अन्य जमातीच्या व्यक्तीला ती द्यायची आहे.

दोन्ही कायद्याच्या तरतुदी, अंमलबजावणीचा कालावधी सोडला तर बहुशः समान आहेत.

### *दोन्ही आदिवासी कायद्यांच्या प्रमुख तरतुदी अनुसूचित जमाती कोणत्या ?*

या दोन्ही कायद्यांच्या प्रयोजनाकरीता भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 342 अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात 47 अनुसुचित जमाती ठरविण्यात आल्या आहेत.

शेडयुल्ड कास्ट ॲड शेडयुल्ड ट्राइब्ज ऑर्डस् (ॲमेंडस् ॲक्ट 1976) कायदा क्रमांक 108 / 1976 मधील परिशिष्ट दुसरे (कलम 4

नुसार) कायदा 35 / 1974, कलम 36 (2) 14 / 1972,कलम 2 (1) (फ) (परिशिष्ट एक पहा)

"हस्तांतरण ' या दोन्ही कायद्यानुसार या संज्ञेत दिनांक 1 एप्रिल 1957 रोजी सुरू होणा–या व 6 जुलै 1957 रोजी संपणा–या व त्यानंतरही अनुसूचित जमातीच्या व्यक्तीने आपल्या जमीन वहीवाटीचा कब्जा जमातेतर व्यक्तीकडे हस्तांतरीत करणे याचा समावेश होतो. मात्र अशी जमीन प्रारंभापुर्वी म्हणजे 1 जुलै 1974 पुर्वी कृषीतर म्हणजे बिनशेती वापरासाठी नसली पाहीजे. म्हणजेच ती शेतजमीन असली पाहीजे.

### *प्रकरण कोण सुरू करणार ?*

जिल्हाधिका–यास स्वाधिकारे (स्वतः होऊन) (Suo-MOtu) प्रकरण सुरू करता येईल किंवा बाधीत आदिवासी व्यक्तीने अर्ज केल्यावर प्रकरण चालू करता येईल.

आदिवासी कायदा 35 / 1974, कलम 36 (3) 14 / 1975 कलम 3 (1)

### *कायद्याची मुदत*

कायदा अंमलात आल्यापासून तीन वर्षात प्रकरण सुरू करता येईल. आता ही तीन वर्षाची मुदत 30 वर्ष कारण्यात आली आहे.

(35 / 74 कलम 36 (3) / 14 / 75 कलम 3)

### *सार्वजनीक प्रयोजनासाठी संपादन केलेली जमीन*

हस्तांतरीतीची जमीन सार्वजनीक प्रयोजनासाठी संपादन केल्यामुळे भूमिहीन झाल्यानंतर जुलै 1974 पुर्वी जमीनीचे हस्तांतरण झाले असेल तर केवळ निम्मी जमीन आदिवासीला प्रत्यार्पित करता येईल.

(14 / 1975 कलम 3 (2) चे परंतुक)

### *बोजारहीत जमीन पुनः प्रस्तापित होणार*

बिगर आदिवासीकडील हस्तांतरीत जमीन आदिवासींकडे बोजा विरहीत पुनः प्रस्थापित झाल्यानंतर ती स्वतः कसण्याची हमी द्यावयाची आहे.

(35 / 74 कलम 36–3 (फ) 14 / 75 कलम नियम 3(3))

### *बेकायदेशीर हस्तांतरणाचे बाबतीत रक्कम देणेची जरूरी नाही.*

हस्तांतरण बेकायदेशिर असेल तेव्हा आदिवासीने त्यास जमीन परत मिळाल्यावर काही एक रक्कम बिगर आदिवासीला देणेची जरूरी नाही. पण जेंव्हा हस्तांतरण कायदेशिर असेल तेंव्हा हस्तांतरीत कायदेशिर असेल तेंव्हा हस्तांतरीत जमीन आकारणीच्या 48 पट रक्कम एका ठोस रक्कमेत किंवा जिल्हाधिकारी ठरवून देतील त्याप्रमाणे 4 1 / 2 टक्के व्याजासह बाजारापेक्षा जास्त नाहीत. अशा हप्त्यांनी द्यावयाची आहे.

35 / 74 कलम 36–3 (ब) 14 / 79 कलम नियम 3 (4) ब 3 चार (क) खंड1 )

### *जमीन सुधारणेची रक्कम जिल्हाधिकारी ठरवणार*

बिगर आदिवासीने जर जमीनीमध्ये सुधारणा केली असेल तर जिल्हाधिकारी ठरवतील ती सुधारणा खर्चाची रक्कम ठोस रक्कमेत अथवा 4 1 / 2 टक्के व्याजाने 12 पेक्षा कमी हप्त्यात आदिवासीने बिगर आदिवासी जमीन मालकाला द्यायची आहे.

(35 / 74 कलम 36–3 (ब) 14 / 79 कलम 4 ब)

### *जमीन आदिवासीनी स्विकारली नाही तर ती षासनाकडूंन वर्ग होणार*

बिगर आदिवासीकडील आदिवासींची हस्तांतरीत जमीन आदिवासीला पुनः प्रस्थापित करता येणार नाही. तेव्हा. अशा जमीनी शासनाकडे नीहीत होतील आणि ठरवुन दिलेल्या निर्बंधासह अन्य जमातीच्या व्यक्तीला देण्यात येतील.

(35 / 1974 कलम 36 (3) (ड) ).

(14 / 1979 कलम 5 – अ )

### *तीन वर्षात आयूक्तांना पुर्नरीक्षण करता येते*

जिल्हाधिका–यांच्या आदेशावियध्द जेंव्हा अपिल दाखल करण्यात आले नसेल तेंव्हा महसुल आयुक्तांना तीन वर्षाचे मुदतीत दिलेल्या निर्णयाचे पुर्नरीक्षण करता येईल मात्र शासनाला जिल्हाधिका–यांच्या हुकुमाचे पुर्ननिरीक्षण केव्हाही कागद मागवुन करता येईल. कालमर्यादेचे बंधन शासनाला नाही.

(कायदा क्र. 35 / 1974 कलम कायदा क्र.141975 कलम 6)

### *आदिवासींची घोर फावणुक*

या दोन्ही कायद्याखाली आदिवासींच्या जमीन बळकावलेली हजारो प्रकरणे सुरू झाली आदिवासींच्या आशा पालवल्या. कायदा आदिवासींच्या जमीनींना संरक्षण देणारा असला तरी याबाबतची वस्तुस्थिती वेगळी असल्याचे शासकीय आकडेवारीवरून दिसून येते. ठाणे

जिल्ह्यात सुरू केलेल्या 6060 प्रकरणांपैकी 4.412 म्हणजेच 73 टक्के प्रकरणे रद्द केली.(भुस्कुटे रा. वी. 2000)

### दोन्ही कायद्याच्या 30 वर्शातील अंमलबजावणीचा तपशीलवार आढावा

हे दोन्ही कायदे अंमलात आल्यानंतर 2 फेब्रुवारी 1979 पर्यंत या कायद्याच्या अंमलबजावणी बाबतचा एक अहवाल संक्रेटरी आणि आयुक्त आदिवासी कल्याण, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पूणे यांनी 1979 मध्ये प्रसिध्द केलेला आहे. त्यातील अंमलबजावणीचा आढावा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | महाराष्ट्र कायदा क्र.35/1974 | महाराष्ट्र कायदा क्र.14/111975 |
|---|---|---|---|
| 1 | सक्षम अधिका—यांकडे नेमलेली प्रकरणे | 14,770/— | 31,404/— |
| 2 | प्रथमिक चौकशीनंतर जमीन पुनःप्रस्थापित करण्यास पात्र आढळून आलेली प्रकरणे | 14, 201/— | ...................... |
| 3 | तपशीलवार चौकशीनंतर रद्द झालेली प्रकरणे | 7,934/— | 14, 377/— |
| 4 | जमीन पुन्हा प्रस्तापित करण्याचा हुकुम झालेली प्रकरणे | 6, 264/— | 9, 437/— |
| 5 | प्रत्यक्ष जमीन कब्जा देण्यात आला | 4, 895/— | 6, 404/— |

वरील आकडेवारी वरून असे स्पष्ट होते की,

### निष्कर्ष :

स्थगिती आदेश आणि अन्य कारणांमुळे या कायद्याची अंमलबजावणी समाधानकारक झालेली नसल्याचा निष्कर्ष या अहवालात काढलेला आहे. दोन्ही कायदे अंमलात आल्यानंतर 5 वर्षाचे कालावधीतील हा अहवाल आहे. आता हे कायदे अंमलात येंऊन जवळ—जवळ 29 वर्षे झाली आहेत. तेंव्हा या कायद्यांच्या अंमलबजावणीचे मुल्यांकन करण्याची निश्चित आवश्यकता आहे. या दोन्ही कायद्यांचा उद्देश कितपत सफल झाला हे देखिल या मूल्यांकनाने सुस्पष्ट होईल. तेव्हा या दोन कायद्यांखाली अर्ज दाखल करण्याची मुदत वाढविण्याचा निर्णय घेतानांच गेले 30 वर्षातील तज्ञांच्या समिती मार्फत या कायद्याच्या अंमलबजावणीचा तपशीलवार आढावा तज्ञांच्या समिती मार्फत घेऊन तो प्रसिध्द केला तर सर्वार्थाने उपयुक्त ठरणार आहे.

### संदर्भ :

1). "भुस्कुटे रा. वि." अंकुर ट्रस्ट 2000.
2). "पाटील वैशाली" मुदत संपत आलेल्या आदिवासींच्या संरक्षणार्थ कायदा दै. कृषिवल 2002.
3). आदिवासी कल्याण, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षसंस्था पुणे अहवाल 1979.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org